CMYK

## भरधाव वेगाने जाणाऱ्या रिक्षाचा अपघात

**सोलापूर :** निष्काळजीपणाने भरधाव वेगात रिक्षा चालवल्यामुळे (क्र. एमएच १३ सीटी ३४१८) रिक्षाचा (दि.१०) जुलै रोजी अपघात झाल्याने त्या अपघातामध्ये नेहा मधुकर बनसोडे यांना पोटास डाव्या हाताला व पायाला गंभीर जखम झाली. तसेच रिक्षातील इतर प्रवाशांच्या जीवितास कारणीभूत ठरल्याप्रकरणी नेहा मधुकर बनसोडे (वय २२ वर्षे, रा. मु. पो. केगाव, ता. उत्तर सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून श्रावण पांडुरंग भालेकर (वय ४५ वर्षे, रा. मु.पो. केगाव, ता. उत्तर सोलापूर) याच्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात (दि.१२) जुलै रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी ढोबळे हे करीत आहेत.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


## शेतकऱ्याचे ७२ हजार रुपये दिवसा पळवले

**अक्कलकोट :** बँकेतील पैसे काढून दुचाकीत ठेवलेल्या एका शेतकऱ्याच्या पिशवीतून चोरट्याने ७२ हजारांची रोकड पळवली. ही चोरी गुरुवारी दुपारच्या सुमारास अक्कलकोट येतील विजय कामगार चौकात घडली. या संदर्भात प्रवेश रमेश महादेव म्हेत्रे (रा. उडगी) यांनी अक्कलकोट उत्तर पोलिसात फिर्याद दाखल केली. ते साखर कारखान्याला ऊस पुरवठा केले होते. त्यातून बँकेत जमा झालेले ७२ हजार रुपये काढून ती रक्कम दुचाकीच्या टाकीवरील पिशवी ठेवले होते. त्यानंतर ते शेजारच्या दुकानात जाऊन शेती मालाविषयी चौशी करीत होते त्यावेळी चोरट्याने पिशवीतील पैसे पळवले असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार अंगुले पुढील तपास करीत आहेत.

www.surajyadigital.com । मंगळवार, दि.१५ जुलै २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : २८६ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२

### ‘खाकी’ वर्दीच्या डोक्याला लागला शॉट; नातेवाईकांसह ग्रामस्थांची मती गुंग

# मंगळवेढ्यात डोके चक्रावणारा जळीतकांडांचा जांगडगुत्ता; कडब्यात जळालेली ‘किरण’ नव्हेच; म्हणे, जळालेली महिला दुसरीच!

**सोलापूर-मंगळवेढा/खास प्रतिनिधी**

**दामाजीपंताची नगरी आणि ज्वारीचे कोठार म्हणून उभ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या मंगळवेढा तालुक्यातील पाठखळ येथे डोके चक्रावणारा जांगडगुत्ता झाला आहे. या गावच्या शिवारातील सावत वस्तीवर जळालेल्या कडब्याच्या गंजित विवाहित महिलेचा मृतदेह आढळून आला. हा मृतदेह येथील विवाहिता किरण सावत हिचा असल्याचे तिच्या नातेवाईकांकडून सांगण्यात आले. या घटनेची मंगळवेढा पोलिस ठाण्यात नोंद झाली. याप्रकरणी मृत किरण हिचा नवरा नागेश सावत याला ताब्यात घेऊन पोलिसांकडून चौकशी सुरु असतानाच, दुसरीच माहिती समोर आली. जळालेल्या अवस्थेमधील मृतदेह हा किरण हिचा नसून किरण ही पुण्यात असल्याचे सा सांगण्यात आले. तिला मंगवेढ्यात परत आणण्यात येत असल्याचं कळतं.**

दरम्यान कडब्याच्या गंजित जळालेला मृतदेह हा विवाहित किरण हिचा नसेल तर दुसऱ्या कोणत्या महिलेचा होता? या महिलेस नागेश सावत यांच्या कडब्याच्या गंजित आणून जाळण्याचा तथाकथित प्रकार कोणी केला? किरणने आत्महत्या केली नव्हती, ती परगावी निघून गेली होती तर तिचा नवरा नागेश यांनी कडब्याच्या गंजित पेटवून घेऊन तिने आत्महत्या केली असे नातेवाईक, ग्रामस्थ तसेच पोलिस यांना कसे काय सांगितले? हे सगळे प्रश्न सोमवार (ता.१४) रात्री उशीरापर्यंत अनुत्तरीतच राहिले. या प्रकरणाचा छडा लावण्याचे मोठे आव्हान मंगळवेढा पोलिसांसमोर आहे.



**पाठखळ : हाच तो किरण सावत या महिलेचा फोटो. जिने कडब्याच्या गंजित जाळून घेऊन आत्महत्या केली, असे नातेवाईकांसह पोलिसांनी सुरुवातीला सांगितले. दुसऱ्या छायाचित्रात याच ठिकाणची कडब्याची गंज जी पूर्णतः जळून खाक झाली. घटनेच्या ठिकाणाहून धूर निघत होता. याच गंजीमध्ये किरण सावत हिने स्वतःला जाळून घेतल्याची माहिती पसरली.**

- विवाहिता किरण सावत मृत नव्हे, तर निघून गेल्याची माहिती समोर
- कडब्याच्या गंजीत जळालेली ‘ती’ महिला कोण? सोमवारी रात्री उशीरापर्यंत राहिले अनाकलीय कोडे
- किरण मृत झाली नसेल तर तिच्या मृत्यूबद्दल मंगळवेढा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली कशी?
- जळीतकांडाची घटना एक मात्र अनुत्तरीत प्रश्न अनेक

किरण सावत हिच्या मृत्यूप्रकरणी तिचे वडिल दशरथ दोडगे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवरा नागेश सावत यास ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडे चौकशी सुरु आहे. मात्र अद्याप घटनेच्या पार्श्वभूमीवर, माहिती समोर आलेली नाही. तपास गतीने सुरु आहे.

**-विजय पिसे, सहायक पोलिस निरीक्षक, मंगळवेढा पोलिस ठाणे**

**घटनेबद्दल ‘अशी’ आहे फिर्याद :** मृत किरण हिचे वडिल दशरथ दोडगे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सोमवारी रात्री साडेतीन वाजता त्यांना चुलत सासरे दत्तात्रय सावत यांचा फोन आला. ‘तुमची मुलगी किरण हिने पेटवून घेतले आहे, तुम्ही या’ असे निरोप दिल्यानंतर पहाटे ४ :१५ वाजता आम्ही पाठखळच्या सावत वस्तीवर पोचलो तेव्हा किरणचा मृतदेह पूर्णपणे भाजलेल्या अवस्थेत होता. आम्ही किरणला ओळखले. घटनेत कडब्याची गंज जळून खाक झाली होती. लोकांची गर्दी झालेली होती. ‘मुलगी किरण हिस कोणत्या कारणाने मरण आले? तिला कोणी व कशाने मारले? याचा तपास होऊन दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी’ असे फिर्यादीमध्ये नमूद केले आहे.

### घटनेचा आज छडा लागण्याची शक्तता

डोके चक्रावून सोडणाऱ्या पाठखळ येथील त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर, मंगळवेढा पोलिसांकडून धागेदोरे शोधण्याचा प्रयत्न सुरु आहे. कसून तपास सुरु आहे. सोमवारी रात्री किरण हिचा नवरा नागेश याच्याकडून बरीच माहिती हाती लागेल, त्यातून मंगळवार या घटनेच्या मुळाशी पोलिस पोचतील असे सांगण्यात आले.

### ‘तो’ मृतदेह किरणचा समजून मामाने प्रेत पोस्टमार्टमसाठी नेले सोलापुरात

विवाहित किरण हिचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळल्यानंतर तिचे वडिल दशरथ दोडगे यांनी मंगळवेढा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरुन तो मृतदेह पोलिसांच्या मदतीने किरण हिचे मामा यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी सोमवारी दुपारीच नेल्याची माहिती सावत यांच्या नातेवाईकांसह पोलिसांकडून देण्यात आली.

### जळालेली किरण नव्हे, तर ती दुसरी महिला कोण?

सावत वस्तीवर कडब्याच्या गंजित जळालेल्या अवस्थेत आढळलेला मृतदेह हा किरण सावतचा नाही, किरण ही तर निघून गेली, तिला आणण्यासाठी सोमवारी रात्री उशीरापर्यंत प्रयत्न सुरु होते, अशी माहिती नातेवाईकांसह पोलिस सूत्रांकडून मिळाली. जळालेल्या अवस्थेमधील मृतदेह जर विवाहित किरणचा नसेल तर मग कडब्याच्या गंजित आढळलेला मृतदेह दुसऱ्या कोणत्या महिलेचा आहे, या महिलेस कडब्यात आणून कोणी जाळले? त्याचे कारण हे सगळे प्रश्न सोमवारी रात्री उशीरापर्यंत अनुत्तरीत राहिले. या प्रश्नांची उकल पोलिस तपासामधून होणार आहे.

### विवाहिता किरण समोर आल्यानंतर एका बाजूने सत्य येईल समोर

किरण हिचा मृत्यू झालेला नाही, ती इतरत्र आहे, तिला आणण्यासाठी तिचे नातेवाईक गेल्याची माहिती सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मिळाली. सोमवारीच रात्री उशिरापर्यंत किरणला मंगळवेढ्यात आणले जाईल, असे सांगण्यात आले. दरम्यान, जर किरणचा खरोखरच मृत्यू झाला नसेल ती जिवंत असेल, ती समोर आली आली तर या घटनेची एक बाजू क्लिअर होणार की कडब्यात जळालेली महिला ही किरण नाही.

### म्हणे, कडब्यात आगीमधील मृतदेह हा कोण्या वेडसर महिलेचा

पाठखळमध्ये कडब्याच्या गंजित आढळलेल्या महिलेच्या मृतदेहावरुन सोमवारी सायंकाळनंतर वेगवेगळ तर्क-वितर्क आणि चर्चांना जणू काही उधाण आले. आगीत होरळपलेला मृतदेह हा किरण सावत या विवाहितेचा नसून किरण ही अन्यत्र ठिकाणी आहे, अशी माहिती मिळाल्यानंतर या घटनेला वेगळेच फाटे फुटणे सुरु झाले. वेडसर महिलेस कडब्याच्या गंजित घालून जीवे मारण्याचा प्रकार झाला, अशा चर्चेची वावटळ पाठखळ आणि परिसरात सोमवारी रात्री उठली.

## गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल लांबवला

**सोलापूर :** रोनक फॅशन नवीपेठ येथे मुलांचे शाळेचे कपडे खरेदी करण्यासाठी गेले असता (दि.९ जुलै) रोजी गर्दीचा फायदा घेवून अज्ञात चोरट्याने नजीर नबीलाल शेख यांचा सुमारे ८० हजार रुपये किंमतीचा ॲपल आयफोन १४ प्रो मॅक्स मोबाईल चोरुन नेला आहे. नजीर नबीलाल शेख (वय ५२ वर्षे, रा. केशव नगर, चुना भट्टी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरोधात (दि १२) जुलै रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस कर्मचारी भिमदे हे करत आहेत.

## करमाळ्यात भाजपच्या शहराध्यक्षावर खुनी हल्ला

### कोयत्यासह काठ्यांच्या मारहाणीत जगदीश अग्रवाल जखमी

**सोलापूर/प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. करमाळा भाजप शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल यांच्यावर खुनी हल्ला झाला आहे.

आठ ते दहा जणांनी हल्ला केल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. कोयत्याने व काठ्याने मारहाण केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. हल्याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. करमाळा पोलिसात याबाबत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरुवात असून याबाबत करमाळा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

करमाळा भाजपा शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल यांच्यावर खुनी हल्ला झाल्यानं शरह हादरलं आहे. कोयत्यासह काठ्यांनी जगदीश अग्रवाल यांना मारहाण करण्यात आली आहे.

नेमकी एवढी मारहाण करण्याचे कारण काय? याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. या घचटनेप्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.



**करमाळा : हल्ल्यात जखमी झालेले भाजप शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल रुग्णालयात उपचार घेताना.**

## जयंत पाटील भाजपच्या वाटेवर?

### राजकारणात मोठ्या उलथापालथीची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, जयंत पाटील यांच्या भाजप प्रवेशाबाबत बोलणी अंतिम टप्प्यात आहेत. मात्र, त्यांना हव्या असलेल्या मंत्रिपदावरून काही अडचणी येत असल्यामुळे प्रवेश रखडल्याची शक्यता आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. त्यामुळे आगामी काळात काहीतरी मोठं घडणार असल्याचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे आगामी काळात भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. या चर्चांमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे पडद्यामागे तशा घडामोडी घडत आहेत.

सूत्रांच्या हवाल्याने जयंत पाटील आणि भाजप यांच्यात एकमत झालं आणि पक्षप्रवेशाचं निश्चित झालं तर महाराष्ट्राच्या राजकारणातला हा नवा भूकंप मानला जाणार आहे. जयंत पाटील हे खरंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे अतिशय विश्वासू आणि जवळचे सहकारी आहेत. ते अनेक वर्षांपासून शरद पवारांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

जयंत पाटील भाजपात जाणार असल्याच्या चर्चांना उधाण येण्याचं टायमिंग देखील महत्त्वाचं आहे. जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा आहे. त्यांच्या राजीनाम्याची काल चांगलीच चर्चा होती. पण त्यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड आणि नंतर खासदार सुप्रीया सुळे यांनी वृत्ताचं खंडन केलं. जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. पण तरीसुद्धा दुसऱ्या बाजूला जयंत पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे सर्वकाही ठरलं आहे. आता केवळ टॉपच्या खात्याचं मंत्रिपद मिळालं तर जयंत पाटील हे भाजपात प्रवेश करतील, अशी चर्चा आहे. असं असलं तरी हे सगळं भाजपच्या पक्षश्रेष्ठींवर अवलंबून असल्याची देखील माहिती आहे.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कितीतरी स्वप्ने रंगवली होती मी!


संगम श्री डे
247-35-159

संगम श्री नाईट
---------

कल्याण
789-44-248


मुंबई
560-14-338


# मोटारीखाली डॉ.आशिष पनशेट्टींचा मृतदेह बेवारसस्थितीत पडून

## हत्तूर येथे मध्यरात्री घडला अपघात

**सोलापूर/प्रतिनिधी**

**मध्य रात्रीच्या सुमारास आपल्या गावाकडे जात असताना खड्ड्यात उलटलेल्या मोटारीखाली सापडून ४० वर्षीय डॉक्टर गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात हत्तूर (ता.दक्षिण सोलापूर) येथील नाईकवाडे यांच्या शेताजवळ सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आला. मध्यरात्री घडलेल्या हा अपघात सकाळी ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आला. तोपर्यंत मृतदेह मोटारीखालीच बेवारस स्थितीत होता.**



**मृत आशिष पनशेट्टी**

आशिष इरण्णा पनशेट्टी (वय ४०, रा. तडवळ, ता. अक्कलकोट) असे मयत झालेल्या डॉक्टरांचे नाव आहे. ते काल रविवारी रात्री सोलापुरात डॉक्टरांच्या बैठकीसाठी आले होते. त्यानंतर ते सिंधू विहार येथील आपल्या बहिणीला भेटून एकटेच एमएच १३ सीएस ०३०८ या क्रमांकाच्या मोटारीतून हत्तूर मार्गे तडवळ (ता. अक्कलकोट) येथे निघाले होते.

मध्यरात्रीनंतर हत्तूर येथील नाईकवाडे यांच्या शेताजवळ त्यांची मोटर एका खड्ड्यात उलटल्याने ते खाली सापडून जागीच मयत झाले.

सोमवारी सकाळी सहा वाजेच्या सुमारास हा प्रकार गावातील एका शेतकऱ्याने पाहिला आणि त्याची याची माहिती पोलिसांनी कळवली. त्यानंतर पोलिसांनी मोटर बाजूला काढून त्यांचा मृतदेह काढला.

घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकिय रुग्णालयाकडे उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. मयत डॉ. आशिष पनशेट्टी यांचे तडवळ येथे अश्विनी हॉस्पिटल आहे. त्यांची पत्नी देखील त्याच रुग्णालयात डॉक्टर आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, लहान मुलगा, आई, वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. अपघाताची नोंद विजापूर नका पोलिसात झाली. हवालदार युगे पुढील तपास करीत आहेत.




**सोलापूर : डॉ. आशिष पनशेट्टी यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर हॉस्पिटल परिसरात झालेली नातेवाईकांसह मित्र परिवाराची गर्दी.**




**सोलापूर : अपघातील मधील हिच ती कार.**

CMYK